ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal
A PEER REVIEWED REFERRED JOURNAL

OPEN ACCESS

Volume–IX, Issues–II
March – April 2022

Original Research Article

# नवयुग साप्ताहिक (इ.स. १९४० ते १९४२) व राष्ट्रीय चळवळ :एक अविष्कार

**डॉ. भावना विवेक पाटोळे**

*इतिहास विभागप्रमुख, एल्फिन्स्टन महाविद्यालय **महाराष्ट्र***

**सारांश**

*नवयुग साप्ताहिकाच्या प्रारंभापासून, म्हणजेच इ.स. १९४०ते १९४२ पर्यन्तच्या कालखंडाचा येथे विचार करण्यात आला आहे. या साप्ताहिकाच्या स्थापनेपासून संयुक्त महाराष्ट्र निर्मिती पर्यंतचा प्रवास अखंड असलेला दिसून येतो. प्रारंभापासून म्हणजेच इ.स. १९४० पासून ते इ.स. १९४७ हा पहिला टप्पा तर स्वातंत्र्यप्राप्ती ते इ.स. १९६० मध्ये झालेली संयुक्त महाराष्ट्र निर्मिती हा दुसरा टप्पा म्हणता येईल. संयुक्त महाराष्ट्राचा संपूर्णपणे पुरस्कार करणारे, नवयुग हे महाराष्ट्राच्या इतिहासातील एक प्रमुख साप्ताहिक ठरले.*

*प्रारंभीच्या काळातील वृत्तपत्रे ही मुळातच सामाजिक धार्मिक सुधारणांनी प्रेरित झालेली होती. तत्कालीन वृत्तपत्रांची ती वैशिष्टे होती. राजकिय जाणिवांची रूजवात, राष्ट्रीय कॉंग्रेसचा झालेला उदय व विकासाच्या पार्श्वभूमीवर एतद्देशीय वृत्तपत्रांमध्ये होणारे बदलही स्वाभाविक होते. नंतरच्या काळातील वृत्तपत्रे ही राजकिय दृष्टीने प्रभावित होते. राजकिय वृत्तपत्र म्हणून केसरीने विशेष ओळखही निर्माण केली होती. लोकमान्यांच्या बाणेदार नेतृत्वातून तळपणारा, इ.स. १८८१ ते १९२० हा कालखंड साधारणत: केसरीयुग म्हणावयास हरकत नाही. विसाव्या शतकाच्या पूर्वाधात, राज्यातील काही साप्ताहिकांवर दृष्टिक्षेप टाकल्यास, मौज, विविधवृत्त, विहार, करमणूक, वसुंधरा, चित्र, संजीवनी ( स्त्रियांचे पहिले साप्ताहिक) निर्भिड, प्रगती, तेज, प्रवासी, धर्नुधारी इ. साप्ताहिके पहायला मिळतात. त्यातही मौजसारखी साप्ताहिके ही उल्लेखनीय होती तर यातील काही साप्ताहिके ही नाममात्र होती.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

## नवयुगारंभ

चित्रपट निर्मितीकरिता नवयुग चित्रपट कंपनी लिमिटेड स्वरुपात काढण्यात आचार्य अत्रेंचा पुढाकार होता. नवयुग चित्रपट कंपनीचे एक प्रकाशन खाते असावे, स्वत:चे एखादे नियतकालिक अथवा साप्ताहिक असावे असे त्यांना वाटत होते. मुंबईत विविध साप्ताहिके असतांना पुण्यातही साप्ताहिक असावे, हा विचार अत्र्यांच्या मनात पूर्वीपासूनच होता असे दिसते. अत्रेंनी नवीन वृत्तपत्र काढण्याची अचानक घोषणा केली व नवयुगाचा श्रीगणेशा झाला. पां. वां गाडगीळ हे सहसंपादक म्हणून होते. वृत्तपत्राची इतर व्यवस्था ही रमाकांत वेलवे यांच्याकडे सोपविण्यात आली होती.

१९४०च्या नव्या वर्षाच्या चाहूल लागली ती नवोदय साप्ताहिकाच्या जन्माने. या साप्ताहिकाची किंमत दीड आणा, तर

वार्षिक वर्गणी ५ रूपये होती. १९ जानेवारी १९४० रोजी शासन मंदिराच्या संमेलन प्रसंगी पुरंदर किल्ल्यावर या अंकाच्या प्रकाशनाचा समारंभ पार पडला. २१ जानेवारी १९४०ला नवयुग साप्ताहिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. ते पूणे येथून प्रकाशीत होत होते. अत्रेंच्या पत्राकरितेचाही तो शुभारंभ होता.

या साप्ताहिकातून आचार्य अत्रेंनी त्यांची भूमिका स्पष्ट केली होती. पहिला अंक वाचकांच्या हाती आला होता. पहिल्याच अग्रलेखातून साप्ताहिक नवयुगच्या धोरणावर प्रकाश टाकण्यात आला. वृत्तपत्राचे उद्‌दिष्ट राजकिय होते. या उद्‌दिष्टाचेच प्रतिबिंब प्रत्यक्ष वृत्तपत्रातूनही दिसून येते.'कॉंग्रेसच्या राजकिय धोरणाचा पुरस्कार करणारे जीवन, साहित्य आणि कला यांविषयी पुरातन विचार निर्भीडपणे प्रकट करणारे महाराष्ट्रातील प्रमुख साप्ताहिक' हे नवयुगचे ब्रिदवाक्य होते. ''कॉंग्रेस पुढाऱ्यात मतभेद असूनही त्यांचे सहकार्य कसे होउु शकते. याचे कारण मतभेदाची मुद्‌दे काहीसे गौण असून मतैक्याचे मुद्‌दे महत्वाचे आहेत व प्रत्यक्ष सहकार्याची मतभेदांची धार झिजत जाउुन मतैक्य अधिक दृढावत जाते, हे होय.'' नवयुगपर्वातील हा संकल्प होता. इ. स. १९४०—४१ या कालावधीत ते  पुण्याहून प्रकाशित झाले.

**वेचक—वेधक:**

नवयुगच्या अंकामधून प्रकाशीत होणारे सदर हे वैविध्यपूर्ण व वैशिष्टयपूर्ण दिसून येतात. तत्कालीन सामाजिक राजकीय, सांस्कृतिक व वैचारिक लेख या अंकांतून प्रकाशित झाले. 'व्यक्ती आणि वल्ली' ,'भैरी आणि तुतारी' 'जीवन आणि निसर्ग', 'परराष्ट्रीय वृत्तविवेचन ', 'मुंबईचे बातमीपत्र', 'अत्रे उवाच' , 'कामगारांच्या सृष्टीत', 'लेखणीचे ललीत', 'शिष्टाचार व संस्कृती', 'वाङ्मय चर्चा', 'शास्त्र व जीवन', 'व्यक्तीदर्शन', 'हिंदी राजकीय आंदोलने'  अशा बहुविध सदरांनी  ते नटले होते. नवयुगातून मौलीक व्यक्तींच्या मुलाखती प्रकाशित झाल्या.

'अत्रे उवाच' या सदरातून सामाजिक सांस्कृतिक, साहित्य विषयक घडामोडींच्या संदर्भात अत्रेंनी  लिखाण केले. अत्रेंनी विविध टोपण नावांनी त्यांनी विशेष लेख लिहिले. नवयुगाच्या सुरूवातीपासूनच अग्रलेख, सूफटे ही राजकिय असावीत या धोरणामुळे सहसंपादक पा.वा.गाडगीळ हे याकडे लक्ष देत असत. ते राजकिय लिखाण करीत असत. नंतर अनंत काणेकर व त्यानंतर लालजी पेडसेंनी राजकिय लिखाणाची धूरा सांभाळली. तिसऱ्या वर्षी र.गो. सरदेसाई यांनी हे काम पाहिलेले दिसते. पुढच्या काही वर्षांत नवोदयला मुख्यत्वे राजकीय स्वरूप आले व राजकीय लिखाणही अत्रे यांनीच केले.

**देशातील तत्कालीन राजकीय संदर्भ:**

विसाव्या  शतकातील पूर्वाधास टिळकांच्या मृत्यूनंतर कॉंग्रेसची धुरा गांधीजींकडे आली. महात्माजींच्या नेतृत्वाखाली, कॉंग्रेस चळवळ ही जनतेची चळवळ म्हणून विकसीत झाली. दुसरे महायुध्द सुरू झाले, तसा हा वणवा आशिया अफ्रिका खंडातही पसरला होता. यात ब्रिटीशही सामील झाले होते. भारतीयांचा विचार न करता देशाला  युद्‌धात सामिल केल्याने या साम्राज्यवादी युद्‌धाचा निषेध करण्याकरिता महात्मा गांधींनी व्यक्तिगत पातळीवरील सत्याग्रहाकरिता परवानगी दिली. राष्ट्रव्यापी आंदोलनाकरिता भारत अदयाप तयार नव्हता. सुभाषचंद्र बोस ,फॉरवर्ड ब्लॉक तसेच कम्यूनिस्ट पक्ष हे  राष्ट्रवादी लढा उभारावा, याकरिता आग्रही होते. कॉंग्रेस ही भारतीयांच्या राजकीय स्वातंत्र्याची चळवळ होती. इ.स. १९३५ मध्ये ब्रिटीश सरकारने 'गर्व्हनमेंट ऑफ इंडिया ॲक्ट' हा कायदा संमत करून प्रांतिक सरकारांच्या निवडणुकीत कॉंग्रेसला यश मिळून ११ पैकी ७ प्रांतांमध्ये कॉंग्रेस प्रतिनिधी निवडून आले. १९३७ ची निवडणूक हा ऐतिहासिकदृष्टया महत्वाचा टप्पा म्हणता येईल. १९३७ मध्ये प्रत्यक्ष कॉंग्रेस पक्षातील उमेदवार हे राजकारणात उतरले होते. हा महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

कॉंग्रेसच्या ठरावाप्रमाणे १९३९ च्या अखेरीस प्रांतीय कायदेमंडळातील मंत्रिमंडळांनी राजीनामे सादर केले होते. हा लढा संपूर्ण कॉंग्रेसच्या मागणीकरिताचा होता. मुस्लीम लीगने मार्च १९४० मध्येच पाकिस्तानची मागणी देखील केली होती. हिंदुत्ववादी संघटनांनी लीगच्या या मागणीला कडाडून विरोध केला. राष्ट्रीय चळवळीमध्ये गांधींनी आपली भूमिका मांडली. गांधीजींनी इ.स. १९४० मध्ये व्यक्तिगत सत्याग्रहाच्या मोहिमेला प्रारंभ केला. इ.स. १९३९ ते इ.स. १९४५ या काळात दुसरे महायुद्ध झाले. जर्मनी व जपान आगेचूक करित असताना ब्रिटन व त्यांच्या मित्र राष्ट्रांची पिछेहाट होत होती. 'चले जाव' चळवळीची घोषणा करण्यात आली. भारतीय स्वातंत्र्याकरिताचा तो अखेरचा लढा होता. तो कालखंड राजकिय पत्रकारितेचा होता. या सर्वांचे पडसाद वृत्तपत्रातून उमटले. नवयुगाला राजकिय साप्ताहिकाचे स्वरूप आले.

**राष्ट्रीय कॉंग्रेस व नवोदय**

नवोदयमधील लेख व अग्रलेखांतून राष्ट्रीय चळवळीचे प्रतिबंब उमटले. नवोदयच्या पहिल्याच अंकात ''हिंदुस्थानला स्वत:ची राज्यघटना ठरविण्याचा सर्वाधिकार ब्रिटीश सरकारने द्यावा ही घटना हिंदी घटना समितीने ठरवावी हेच आता कॉंग्रेसचे मागणे आहे. आपली राज्यघटना ठरविण्याचे स्वातंत्र्य हिंदुस्थानला मिळणे हाच आजच्या कॉंग्रेसच्या स्वातंत्र्याच्या मागणीचा अर्थ होय'' असे नवोदयमध्ये स्पष्ट करण्यात आले होते. १९३० नंतर प्रत्येक वर्षी २६ जानेवारी १९३० पासूनच दरवर्षी २६ जानेवारी स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा केला जाउ लागला. २६ जानेवारी १९४० ला साम्राज्यशाही युद्धात ब्रिटिंशांशी सहकार्य न करता आगामी स्वातंत्र्यलढा शांततेने व निकराने लढण्याचा जनतेचा निर्णय निश्चय केला होता. कॉंग्रेसजनांनी दैववाद विसरा,आपल्या मागच्या चुकांचा आढावा घ्या व पुढारी तुरूंगात जात असताना प्रत्येकाने स्वत: सेनापती व्हावे असे नवोदयकार लिहितात. कॉंग्रेसच्या या स्वातंत्र्यदिनात जात, धर्म विसरुन कोटयावधी जनता राष्ट्रीय भावनेने सहभागी होत असल्याची बातमी देतानाच, ३० तारखेच्या केसरीत त्याची अक्षरानेही बातमी नसल्याची वृत्तांकन नवोदयात येते. स्वातंत्र्य लढयात शांतता, संयमाकरिता पुढाऱ्यांची जबाबदारी व दुष्काळसारख्या आपत्तीचे जनजीवन युध्दामुळे भरडली जाईल व क्षोभ होईल. धोक्याची जाणीव करुन देतांनाच कॉंग्रेस सेवकाने जनतेच्या अंत:करणात शिस्तीची भावना उत्पन्न केली पाहिजे याची जाणिव करून दिली.

महात्मा गांधीचे व्यक्तिमत्व, नेतृत्व व कार्याची विशेष नोंद नवोदय मध्ये घेण्यात आली होती. 'युध्दाच्या भयंकर संकटात इंग्लंड सापडले आहे अशावेळी आम्ही सत्याग्रह करू तर त्याचा इंग्लंडच्या मनावर योग्य ती परिणाम होणार नाही. मग म्हणून युध्दानंतर तहाच्या वेळी स्वातंत्र्य लढा करावा', अशी गांधीजींची भूमिका यातून आलीच. गांधीजींचा वाढदिवसाच्या निम्मिताने २ आक्टोबरला 'गांधीजी चिराउ होवोत' चा नारा दिला. सेवाग्रामवर खास दोन पानी लेखात, एकात गांधीजी तर दुसऱ्यात कस्तुरबांवर चित्रयुक्त लेख पहावयास मिळतो. सेवाग्राम ही गांधीजींची महान प्रयोगशाळा असली तरी, राजकीय ते हिंदुस्थानचे १० डाउनिंग स्ट्रीट आहे. कॉंग्रेसची प्रत्येक चळवळ येथेच जन्मास येते. परमेश्वराची जशी विविध रुपाप्रमाणेच सेवाग्राम हे हिंदी जनतेला हरीद्वार वाटते. सेवाग्राम हे चिखलाईतून निर्माण झालेले मानवी जीवनाचे कमल आहे, असे नवोदयमध्ये म्हटले आहे. महात्मा गांधींजी पत्रके छापतांना काय कामी नये हा हुकूम सरकारने मागे घ्यावा ही स्पष्ट करुन विस्तृत चर्चा या लेखात आलेली आहे.

गांधीजींची सध्याची मर्यादित राष्ट्रीय चळवळ एक बलाढय राजकीय पक्ष म्हणून कॉंग्रेसचे अस्तित्व कायम व फारशी उपयुक्त ठरत नाही हे मांडण्यात आले. या काळात सर्व मोठमोठे पुढारी तुरुंगात गेले असतांना शेतकरी, कामकरी बहुजन

समाजाच्या दु:खाकडे त्यांनी लक्ष वेधले. देशातील युवकांसमोर ना.रा. गोरे यांचा कार्यक्रम देण्यात आला. देशाविषयी प्रेम असणाऱ्या प्रत्येक युवकाने याचे मनन करावे असे कळकळीचे आवाहन केले गेले. मुंबई, अहमदाबाद या ठिकाणी हल्ले होत होते. यावेळी जनतेने लढे लढवा असे अत्रे लिहितांत.

दुसऱ्या महायुध्दाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय घडामोडींची माहिती, लेख, त्याचा भारतावर होणारा परिणाम याची चर्चा करण्यात आली. सोव्हिएत रशियाच्या जर्मनीवर केलेल्या हल्ल्यांना महायुध्दात कलाटणी मिळाली. आंतरराष्ट्रीय पातळीवरील बदलांचा वेध घेतानाच, याचा देशावर होणारा परिणाम, राष्ट्रीय लढा यावर लेख आले. 'कॉग्रेस जगली पाहिजे' यावर चर्चा केली. 'हिंदी राजकीय आंदोलने' हे महत्वाचे सदर होते.

९ ऑगस्ट १९४२ च्या आखिल भारतीय कॉग्रेसच्या अधिवेशनाबाबत नवोदयमधील लेखाला ऐतिहासिक महत्व आहे. हिदुस्थानात आजवर अनेक अधिवेशने झाली पण या अधिवेशनाने साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले होते. 'तुझया गुणांवर किती उडवावे शब्दांचे बुडबुडे तुझो पवाडे गातील पुढती शांतीचे चौघडे' असा सूर लावत लाखो लोकांनी गजबजले. मैदान ओस पडल्यानंतर या स्थितीचे वर्णन करताना 'हळदीने पिवळी झालेली नवरी केशवपनानंतर कशी दिसेल' असा प्रश्न केला होता. अत्रेंची लेखणी अत्यंत बोलकी तशीच तडफदार होती.

भारत संरक्षण कायद्याखाली सर्वच नागरिकांचे नागरिक स्वातंत्र्याचे प्राथमिक हक्क नाहीसे झाले असतांना वृत्तपत्रांची गोचनीय दशा अत्रेंनी अग्रलेखातून मांडली होती.''सरकारचे शेपूट सरळ होईल'' असा अत्रेंचा प्रश्न होता. हिंदी जनतेच्या भाकरीचा प्रश्न असतांना भांडवलादार आणि मजूर, सावकार, शेतकरी असे सर्वच या एकाच पक्षाखाली यावेत असा आशावाद मांडला. खास अत्रेशैलीतून 'भाकरी पक्ष' स्थापन होईल का? असा सवाल अत्रेंनी आपल्या लेखातून केला होता. लक्षावधी जनतेची उपासमार होउ लागल्यास देशातील काय परिस्थिती असेल याचे चित्र शब्दापेक्षा कल्पनेनेच चितारलेले बरे हे पोटतिडकीने मांडतानाच राजकीय ऐक्याची वेळ येउन ठेपली आहे, असे त्यांना सूचित करावयाचे होते

**कामगार सृष्टी**

राष्ट्रीय चळवळीमुळे शहरातील व ग्रामीण जनतेत जागृती होत होती. कामगार चळवळ बहरत होती तर डाव्या विचारसरणीचे आकर्षणही वाढले होते. मुंबईमध्ये ९ मे १९३१मध्ये सुरू झालेल्या 'तेज' या साप्ताहिकातून राजकीय घडामोडीतील शेतकऱ्यांची व कामगारांची बाजू निर्भयपणे मांडून त्यांच्या योग्य हक्कांची चर्चा करणारे पहिलेच मराठी साप्ताहिक अशी जाहिरात केसरीतून आली होती.नवयुगातील काही लेखमाला महत्वाच्या ठरतात. 'कामगारांच्या सृष्टीत' या सदरात कामगारांच्या संपाच्या प्रश्नाची नोंद घेण्यात आली. मुंबई व अहमदाबाद येथील गिरण्यांमधील ४/५ लाख मजूर या आठवडयात युध्दाचा महागाई भत्ता न मिळाल्यास सार्वजनिक संप पुकारणार आहेत. 'भांडवलदाराच्या अवजड पर्वताखाली चिरडले जाणारे लाख मजूर संपावर गेले म्हणजे संपाचा ज्वालामुखी असाच भडकण्यास पुढे काय होणार?', हा प्रश्न नवयुग मधून उपस्थित करण्यात आला होता. संपातील स्त्री कामगारांची अपूर्व कामगिरी नवयुगमध्ये अधोरेखीत करण्यात आली.कामगारांच्या संपाच्या ज्वलंत प्रश्नांवरील लेख महत्वाचे होते. दिवसागणिक कामगार संपाच्या स्वरूपावर प्रकाश टाकण्यात आला. यातील सुक्ष्म माहिती लेखातून व्यक्त होत झाली. सरकारने कामगार पुढाऱ्यांना लक्ष करुन त्यांना कैद केल्यानंतर ही कामगार चळवळीवर गदा आणल्याचे नवोदयची भावना होती. भाई लालजी पेंडसे यांनी कामगार संपाबाबत नवयुगमधून लिहिलेल्या लेखमाला वैशिष्टयपूर्व ठरतात. कामगारांच्या अडचणी असंतोष याचे जागरण केले. मजुरांची

आकडेनिहाय माहिती देताना सर्व जातीच्या व धर्माच्या कामगारांची एकी या संपात दिसून आली. कारण ते समदु:खी होते. नवोयुगमधील हे परिक्षण बोलके आहे.

नवयुगातून विद्यार्थी चळवळीचे गंभीर प्रश्न मांडले गेले. दुष्काळी परिस्थितीत व कॉंग्रेस कार्यकर्त्यांचे कर्तव्याची जाणिवा करून देण्यात आली. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले. दुष्काळी परिस्थितीने भाव कडाडले. त्या मानाने सामान्य जनतेच्या पोटापाण्याची व्यवस्था लागणारे सामान्य उद्योगधंदे वाढत नाहीत व वाढणे शक्य नाही. अशा स्थितीत शेतकऱ्यांचा व गरीब जनतेचा प्रश्न समाधानकारक रीतीने सुटणे शक्य नाही. तथापि हा जास्त व्यापक व मूलभूत प्रश्न सोडला तरी दुष्काळाच्या बाबतीत शेतकऱ्यांना शक्य ती मदत मिळावी, अशी दक्षता विशेषता कॉंग्रेस व किसान कार्यकर्त्यांनी घेतली पाहिजे हे निक्षून सांगितले.

वृत्तपत्रसृष्टीत दैनिकांचे स्वरूप बदलले होते. महायुद्धाचा हा काळ हा तसा साप्ताहिकांचाही कालखंड होता. साहित्यविषयक वाद रंगविण्याची रंगभूमीवरील कलाकारांची माहिती, तसेच परदेशातील विविध रंजक माहिती यात समाविष्ट होती. एका लेखात प्रा. शेजवलकर महाराष्ट्राच्या मानगुटीचा समंध या लेखाने खळबळ उडवली होती. 'काचेच्या कपाटातील सिंह' हा स्वातंत्र्यवीर सावरकरांवर टीका करणाऱ्या लेख वादग्रस्त ठरला. अत्रेंनाही हा लेख आवडला नव्हता. आल्याला न विचारताच हा लेख छापण्यात आला हे स्पष्ट करतानाच या अंकाला गालबोट लागल्याची त्यांची भावना होती. म.गांधी, आंबेडकरांच्या वैचारिक मतभिन्नतेचे पडसाद वृत्तपत्रातुन दिसून आले. दुसऱ्या अंकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर रमाकांत वेलदे यांचा लेख आला तेंव्हा या अंकाची नागपूरमध्ये होळी करण्यात आली होती.

**नवयुगची भूमिका**

नवयुगच्या मुखपृष्ठावरील ब्रीदवाक्यातही कालनिहाय बदल झाले. सुरूवातीच्या काळातील 'कॉंग्रेसच्या धोरणाचे पुरस्कार करणारे जीवन, साहित्य आणि कला विषयी पुरोगामी विचार निर्भिडपणे प्रकट करणारे महाराष्ट्राचे प्रमुख साप्ताहिक' अशी लांबलचक ब्रीदवाक्य ठळकपणे वृत्तपत्राच्या माथ्यावर कोरण्यात आले होते. स्वातंत्र्यानंतर 'अखंड हिदूस्थानचा संपूर्ण स्वातंत्र्याचा लोकशाही समाजवादाचा आणि संपूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे महाराष्ट्रातील साप्ताहिक' असे ब्रीदवाक्य झळकले.

नवयुगच्या पहिल्याच अंकावर अभिप्राय देतानाच 'धनुर्धारी'चे संपादक प्रभाकर पाध्ये यांनी, 'अत्रे हे धाडसी गृहस्थ आहेत. गांधीवादी धोरणाच्या पत्रास 'नवयुग' असे नाव देणे त्यांचे धाडसच होय, असा उपहास केला होता. महात्मा गांधीचे व्यक्तिमत्व, नेतृत्व व कार्याची विशेष नोंद नवोदय मध्ये येते. गांधीचे कार्य हिंदुस्तानच्या व जगाच्या इतिहासात अव्दितीय आहे हे मांडताना, गांधीजी व्यक्तित्व व सवा निर्दोष आहेत असे म्हणता येणार नाही. त्यांनी राजकारणात ही चुका केल्या पण स्वाभिमान, संयम, शिस्त व आत्मपरिक्षण होवून कॉंग्रेस गांधीच्या पासून शिकली ते गुण कॉंग्रेस युध्दाच्या अंगी पूर्णपणे बाणवलेले आहेत, असे नवोदयमधून मांडण्यात आले.'पाकिस्तानचा दुराग्रह' मुस्लीम तरूणांचे कर्तृत्व हा वाचक वर्गातील मुस्लीम तरूणाचा लेख प्रकाशित केला. मुसलमानांतील तरूण पिढीच्या विचाराचे निदर्शन करणारा लेख म्हणून आम्ही या लेखात स्थळ देत आहोत असे नवोदयकार देतात.तत्कालीन प्रश्न हसत खेळत पद्धतीने नवयुगमध्ये मांडले गेले होते. नवयुग साप्ताहिक सूरू झाल्यानंतर अत्र्येंचा पहिला जाहीर वाद झाला तो ना.सी.फडके यांच्याशी. १९४० च्या रत्नागिरीच्या मराठी साहित्य संमेलनाचे ना.सी.फडके अध्यक्ष होते. यावेळी नवयुगमधील अत्रेंच्या लिखाणावर टीका केली होती. अर्थातच

अत्रेंनीही नवयुगमधून फडकेंचा समाचार घेतला. हा वाद विकोपाला गेला व अर्थातच वृत्तपत्रातून त्याचे पडसादही उमटले होते. भाषेची पातळी खालावली होती. नवयुग, विविधवृत्त, चित्रा या साप्ताहिकातून यावर सातत्याने टीका होत होत्या. पुढे फडकेंचे 'झंकार' साप्ताहिक आले ते अत्रे फडके वादातून. अखेरीस जेंष्ठ मंडळींनी हा वाद मिटविला.

२६ जानेवारी १९४१ मध्ये नवयुगचा वर्षारंभ थाटात साजरा झाला. याकरिता १९ जानेवारीला याचा खास वार्षिक अंकही निघाला. साहित्यिक नुसती ग्रंथनिर्मिती करुनच थांबत नाहीत तर ते वृत्तपत्र व्यवसायात पडून राजकारण करु लागले आहेत, हे आचार्य अत्रे यांच्या नवयुगने सिध्द केले आहे. राजकारण, समाजकारण व वृत्तपत्र व्यवसाय यांची सांगड घालण्याचे श्रेय आचार्य अत्रेंना काकासाहेब लिमये यांनी भाषणातून दिले व 'धडाडीचे संपादक' म्हणून त्यांना गौरविले. वृत्तपत्रीय लिखाण अनेकावेळा अनेक कारणांमुळे मनात नसले तरी लिहावे लागते. त्यामुळे त्या लेखातील मते ही सर्वतोपरी आपणास मान्यच असतात असे कोणीही समजू नये, असेही अत्रे सांगून जातात. ''पुण्याला कॉग्रेस धोरणाचे प्रचार करणारे एकही साप्ताहिकात नव्हते ही उणीव भरुन काढण्यासाठी मी व काही मित्रांनी नवयुग काढले. परंतु योगायोगामुळे त्यांच्या प्रेरणेने निघाले व मी निराळे मार्गाला लागली, ''असे अत्रे म्हणतात.

सर परशुराम कॉलेजमध्ये झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर वाचल्या नंतर, अत्रें लिहितात, ''...मी स्वत:ला कॉग्रेसचा एक अत्यंत नम्र सेवक समजतो. कॉग्रेसची सेवा माझ्या हातून जेवढी व्हायला पाहिजे होती,तेवढी झालेली नाही. किंबहुना काहीच झालेली नाही हयाची मला पुर्ण जाणीव आहे. तथापी ब्रिटीश साम्राज्यशाहीशी निकराचा झगडा करून हिंदुस्थानाला स्वातंत्र मिळवून देणारी जनतेची एकमेव प्रतिनिधिक संस्था, कॉग्रेस हीच आहे. हया सिध्दांतावर माझ्या संपूर्ण विश्वास आहे. हा आंतरिक विश्वास हीच माझी कॉग्रेस सेवा आहे असे मी समजतो.''

अत्रेंनी नवयुग निर्मिती जाहीर करुन ते लगेचच बाजारात आणले होते. सुरूवातीच्या काळात ते बरेच लोकप्रिय झालेले दिसून येते. परिस्थितीनुरुप नवयुगमध्येही बदल झालेले दिसून येतात. यातील राजकीय लेख नजरेस भरतात. कॉग्रेस पक्ष, कॉग्रेस पक्षातील जेष्ठ नेते , महात्मा गांधी, कामगार या विषयांवर नवोदयमधून लेख तसेच अग्रलेख आले. स्वत: अत्रेंनी वेगवेगळया टोपण नावाने लेखन केले. नवोदयच्या लेखांमध्ये स्तुतीप्रमाणेच टीका, निंदा नालस्ती तर कधी भाषाही घसरलेली दिसते. प्रसंगी यातील अत्रेंनी आपल्याला लेख आवडले नसल्याचेही मांडले. साहित्य विनोद आणि टीका ही आपल्या पत्राची प्रधान अंगे करावयाची असा प्रारंभापासूनच अत्रेंचा संकल्प होता. त्यांच्या लेखातून साहित्य प्रचूर वाक्ये ही वेळोवेळी दिसून येतात. अर्थात विनोदी किस्स्यांची लयलूटही यात झाली. नवोदयवर अत्रेंच्या व्यक्तिमत्वाची झलक असणेही स्वाभावीक होते.

पुण्याचे साप्ताहिक म्हणून नवयुगची ओळख होती. चित्रपट निर्मितीच्या निमित्ताने पुण्याहून अत्रे मुंबईला गेल्यावर नवयुग मुंबईत आले. डिसेंबर १९४० ला नवयुग मुंबईतून प्रकाशीत होत होता. ७ मे १९४४ चा पाचव्या वर्षाचा १९ वा अंक अत्रे प्रिंटींग प्रेसमध्ये छापण्यात आला होता. रामकृष्ण प्रिटींग प्रेसचे मालक बाबुजी सापळे यांच्याकडे नवयुगची व्यवस्था होती. पुढे इ.स. १९५५ मध्ये नवयुगाची लोकप्रियता घसरली. मराठा दैनिकाचा प्रारंभ होताच, १९६०चा नवोदयचा २१ वा अंक, वर्षाच्या सुरुवातीपासूनच मराठा मुद्रणालयात छापण्यात आला होता. नवयुग साप्ताहिक १९६३ पर्यंत चालु होते.

आचार्य अत्रेंचे व्यक्तिमत्व बहुआयामी होते. साहित्यिंक, नाटककार, कवी, चित्रपट, कथालेखक, चित्रपट निर्माते म्हणून ते त्यांना ओळखले जात होते. साप्ताहिक नवयुगापासून त्यांनी वृत्तपत्र व्यवसायात प्रवेश केला होता. त्यांच्या राजकीय कार्याला ते व्यासपिठ मिळाले. पुढे पत्रकार संमेलनाचे ते अध्यक्षही होते. प्रारंभकालीन नवयुग साप्ताहिकातून राष्ट्रीय चळवळीतील विशिष्ट टप्प्यावर, मध्यवर्ती पक्ष म्हणून कॉंग्रेसचे कार्य, भूमिका व नेतृत्व अधोरेखीत होते. तसेच ज्ञान, विज्ञान, साहित्य, कला आदी विषयांना स्पर्श करणारे ''नवयुग'' साप्ताहिक बहुसंदर्भीय ठरते.

**संदर्भ**

रा. के. लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पुणे, १९८४, पृ.९६६

नवयुग, पुणे, २१ जानेवारी १९४०,पृ.१.

'वसाहतीचे स्वराज्य: उतावळे नवरे', नवयुग, पुणे २१जानेवारी,पृ.५

साप्ताहिक नवयुगचे धोरण,नवयुग, पुणे २१ जानेवारी १९४०, पृ.४

नवयुग, पुणे, ४ फेब्रूवारी १९४०, पृ.२५

जनतेने लढे लढवा, नवयुग, मुंबई, २२जून १९४१,पृ.६

नवयुग, मुंबई, '१६ ऑगस्ट १९४२, पृ.६

सरकारचे शेपूट सरळ होईल , नवोदय, मुंबई, ९फेब्रुवारी १९४१,पृ.६

आचार्य अत्रे, अत्रे उवाच, 'भाकरी पक्ष स्थापन होईल का'?, नवोदय, मुंबई, १० ऑगस्ट १९४१,पृ.५.

भेरी आणि तुतारी, नवोदय, मुंबई, २२जून,१९४१,पृ.१५

डॉ. सदानंद गोरे, लोकमान्य ते महात्मा, पुणे, नोव्हेंबर २०१४, पृ. ५०४.

नवयुग, पुणे, २९ सप्टेंबर १९४०, पृ.६.

नवयुग, मुंबई, २२ नोव्हेंबर १९४२,पृ.९.

नवयुग, मुंबई, २६ जानेवारी. १९४२, पृ.३.

आचार्य अत्रे, 'स्वातंत्रवादी तरूणांनो जागे व्हा', मुंबई, १२ आक्टोबर १९४१,पृ.१

***Cite This Article:***

**डॉ. भावना विवेक पाटोळे,** *(2022).* ***नवयुग साप्ताहिक (इ.स. १९४० ते १९४२) व राष्ट्रीय चळवळ :एक अविष्कार,*** Educreator *Research Journal IX (II) Mar-April, 69-75.*